Ref.: AW/SEC/NSE/2023-24/20 Date: May 25, 2023

To,
Listing Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, 5th Floor,
Plot No.C-1, Block G, Bandra-Kurla Complex,
Bandra (E), Mumbai 400 051

Script Code: AWHCL

Dear Madam/Sir,

Sub. : Newspaper Publication of Financial Results

Ref. : Intimation under Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("SEBI Listing Regulations")

With reference to the captioned subject and pursuant to the Regulation 47 of the SEBI Listing Regulations, please find enclosed copies of extract of Audited Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the quarter and financial year ended March 31, 2023 published on Thursday, May 25, 2023 in Business Standard (English) and Loksatta (Marathi) newspapers.

This is for your information and record please.

Yours faithfully,

For and on behalf of
ANTONY WASTE HANDLING CELL LIMITED

HARSHADA PRADEEP RANE Digitally signed by HARSHADA PRADEEP RANE Date: 2023.05.25 18:07:58 +05'30'

HARSHADA RANE
COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER
A34268

Encl: a/a

Nykaa net slumps 72% on low sales, revenue rises 34%



ARYAMAN GUPTA
New Delhi, 24 May

Nykaa parent FSN E-Commerce Ventures on Wednesday reported a 71.8 per cent year-on-year (YoY) decline in its net profit to ₹2.4 crore for the quarter ended March 31. Its net earnings were ₹8.5 crore a year ago.

The company's fashion business witnessed a demand slowdown. Its expenses surged, too, due to growing material and employee costs.

The beauty and fashion brand's revenue, on the other hand, increased 33.7 per cent to ₹1,302 crore in Q4 FY23, up from ₹973 crore in the same period a year ago. However, revenue declined on a sequential basis from ₹1,463 crore.

In FY23, Nykaa's revenue from operations rose to ₹5,144 crore from ₹3,774 crore in FY22, an increase of more than 36 per cent.

The firm's expenses in Q4FY23 jumped 33 per cent to ₹1,303 crore versus ₹979 crore in the corresponding period the previous financial year. Cost for materials consumed rose from ₹16.6 crore in Q3 to ₹97.2 crore in Q4.

Hindalco Q4 net falls 37% to ₹2,411 crore

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, 24 May

Hindalco Industries on Wednesday reported a 37 per cent fall in its consolidated net profit to ₹2,411 crore for the March quarter due to a rise in operational costs.

The company had posted a net profit of ₹3,860 crore during the January-March quarter of 2021-22, the company said in a regulatory filing.

Total income of the company was ₹56,209 crore in the quarter under review against ₹56,057 crore in the year-ago quarter.

The expenses were higher at ₹53,372 crore against ₹51,026 crore a year ago due to a rise in power and fuel charges, employee benefit expenses and inventory costs.

The company's Managing Director (MD) Satish Pai in a statement said, "Our copper business delivered exceptional results recording its highest-ever ebitda, driven by robust market demand, stable operations and higher value-added product sales.

He further said Novelis has shown quarter-on-quarter recovery supported by improved product pricing and favourable product mix.

CATAMARAN TO DOUBLE INVESTMENTS

The money manager of billionaire Infosys founder Narayana Murthy *(pictured)* will hire professionals and double its $1 billion in investments in the next five years, betting India will emerge as a high-quality manufacturing hub. Catamaran Ventures will raise its assets under management to as much as $2 billion and is exploring strategic partnerships in three new areas: deep tech, precision engineering and manufacturing, and renewables, according to Chairman M D Ranganath. That marks a shift from the firm's prior focus on services, he said in an interview. "For the next stage of India's growth, manufacturing is clearly one of the trajectories," he said. "The advantage for India is all this innovation can be tested in India for scale, and then taken to the global markets." BLOOMBERG

समाजमाध्यमांमुळे तरुणांना मानसिक विकार

आरोग्य वार्ता

वॉशिंग्टन : सध्याच्या आधुनिक युगात प्रत्येकाच्याच हाती स्मार्टफोन आहेत. त्यामुळे समाजमाध्यमांचा वापर वाढलेला असून तरुण वर्ग बहुधा समाजमाध्यमांत व्यग्र असतो. मात्र समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे तरुणांना मानसिक विकार होऊ शकतो, असा निष्कर्ष अमेरिकी संशोधकांनी काढला आहे.

'यूएस सर्जन जनरल'ने तरुणांच्या मानसिक आरोग्यावर समाजमाध्यमांच्या संभाव्य धोक्यासंबंधी माहिती प्रसिद्ध केली आहे. १३ ते १७ वयोगटातील सुमारे ९५ टक्के मुले समाजमाध्यमांचा वापर करतात. त्यापैकी एकतृतीयांशपेक्षा जास्त तरुण समाजमाध्यमांचा सातत्याने वापर करतात. मात्र त्यामुळे त्यांना विविध आजार जडत असल्याचे या संशोधकांनी सांगितले. झोपेचा व्यत्यय, कमी झालेले शारीरिक क्रियाकलाप, चिडचिडेपणा, मानसिक तणाव, नैराश्य आदी आजार समाजमाध्यमांमुळे जडतात, असे या संशोधकांनी सांगितले.

किशोरावस्था आणि बालपण हे मेंदूच्या विकासातील एका महत्त्वपूर्ण टप्प्याचे प्रतिनिधित्व करत असते. या टप्प्यात समाजमाध्यमांचा वापर अधिक झाला तर ते हानीकारक ठरू शकते. समाजमाध्यमांच्या आभासी जगात तरुणांचा संपर्क समाजविघातक लोकांशी येतो. त्यामुळे तरुणांमध्ये हिंसकता येऊन त्यांच्याकडून गुन्हे घडू शकतात, असे संशोधक सांगतात.

अलीकडील संशोधनातून असे दिसून आले आहे की, जी किशोरवयीन मुले दररोज तीन तासांपेक्षा जास्त वेळ समाजमाध्यमांवर घालवतात त्यांना नैराश्य आणि चिंता यांसारख्या मानसिक समस्यांना समोरे जावे लागते. समाजमाध्यमांमुळे शारीरिक असमाधान, खाण्या-पिण्याकडे दुर्लक्ष होऊ शकते. त्याशिवाय सामाजिक तुलना वाढून नैराश्यास सामोरे जावे लागू शकते, असे या संशोधकांनी सांगितले.

वाझेंना माफीचा साक्षीदार होण्यास दिलेली मंजुरी ईडीकडून मागे

मुंबई : राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावरील आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी माफीचा साक्षीदार होण्याची तयारी दाखवली होती. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) विशेष न्यायालयात अर्ज करून वाझे यांना या प्रकरणात माफीचा साक्षीदार होण्यास मंजुरीही दिली होती, मात्र ईडीने ही मंजुरी नुकतीच मागे घेतली आहे.



माफीचा साक्षीदार होण्याची तयारी दाखवणारा अर्ज वाझे यांनी फेब्रुवारी महिन्यात ईडीकडे केला होता, मात्र त्यावर ईडीने काहीच प्रतिसाद दिला नाही. दरम्यानच्या काळात सीबीआयने देशमुखांविरोधात दाखल केलेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात वाझे यांना माफीचा साक्षीदार होण्यास विशेष न्यायालयाने परवानगी दिली. त्यानंतर वाझे यांनी देशमुखांविरोधातील आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणातही माफीचा साक्षीदार होण्याची तयारी दाखवली व त्याबाबतचा अर्ज विशेष न्यायालयात केला.

विशेष न्यायालयाने त्याची दखल घेऊन त्यावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश ईडीला दिले होते. त्या पार्श्वभूमीवर ईडीने विशेष न्यायालयात अर्ज करून वाझे यांना या प्रकरणात माफीचा साक्षीदार होण्यास मंजुरी दिली होती. ईडीच्या मंजुरीनंतर विशेष न्यायालयाकडून वाझे यांना माफीचा साक्षीदार होण्यास परवानगी मिळणे शिल्लक होते, परंतु नुकतीच ही मंजुरी ईडीने मागे घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.

'मुंबई ते नवी मुंबई प्रवास २० मिनिटांत'

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून पारबंदर प्रकल्पाच्या कामांचा आढावा

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबई पारबंदर प्रकल्पाअंतर्गत (शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू) मुंबई आणि नवी मुंबई शहराची जोडणी आता पूर्ण झाली असून पुढील काम पूर्ण करत डिसेंबरमध्ये हा सागरी सेतू वाहतुकीस खुला होईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर हा सागरी सेतू वाहतुकीस खुला झाल्यास मुंबई ते नवी मुंबई अंतर दीड-दोन तासाऐवजी केवळ २० मिनिटांत पूर्ण होईल असेही त्यांनी सांगितले. आजचा दिवस आपल्यासाठी आनंदाचा दिवस आहे. हा सागरी सेतू म्हणजे केवळ सागरी सेतू नाही तर राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा मार्ग असल्याची भावना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

मुंबई आणि नवी मुंबई शहरांना थेट जोडत या दोन्ही शहरांतील प्रवासाचे अंतर दीड ते दोन तासांऐवजी केवळ २० ते २२ मिनिटांत पार करता यावे यासाठी मुंबई पारबंदर प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. २०१९ पासून या प्रकल्पाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) सुरू आहे. मागील दोन वर्षांत या प्रकल्पाच्या कामाचा वेग वाढविण्यात आला आहे. सद्यःस्थितीत या प्रकल्पाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामाला वेग देत नोव्हेंबर २०२३ मध्ये हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या प्रकल्पातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असलेल्या मुंबई शहर (शिवडी) आणि नवी मुंबई (शिवाजीनगर) दोन्हींना जोडणाऱ्या २२ किमीच्या संपूर्ण सागरी सेतूचे काम पूर्ण झाले आहे. या कामाचा आढावा बुधवारी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी घेतला. अंत्यत कठीण आणि आव्हानात्मक काम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएचे कौतुक केले.

या प्रकल्पामुळे मुंबईवरून नवी मुंबईच नव्हे तर पुढे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर जाणेही सोपे होणार आहे, कारण हा सेतू द्रुतगती मार्गाशी जोडला जाणार आहे. तसेच नवी मुंबई विमानतळ, जेएनपीएलाही वेगाने जाता येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भविष्यात अलिबाग-विरार बहुउद्देशीय मार्गिकेशीही सागरी सेतू जोडला जाणार असल्याने हा प्रकल्प सामाजिक-आर्थिक विकास साधणारा प्रकल्प ठरणार असल्याचे यावेळी मुख्यमंत्री म्हणाले. तर समृद्धी महामार्गाप्रमाणे मुंबई पारबंदर प्रकल्पही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामाचा शुभारंभ केलेला आणि त्यांच्याच हस्ते लोकार्पण होणारा प्रकल्प असणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले. या प्रकल्पात पर्यावरणाला कुठेही धक्का पोहचविण्यात आलेला नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या सागरी सेतूसाठी ८५००० मे. टन ऑर्थोट्रॉपिक स्टील वापरण्यात आले आहे. ७४७ विमानांइतके हे स्टील आहे. तर पृथ्वीला चार प्रदक्षिणा होतील इतक्या प्रिस्ट्रेसिंग वायरचा वापर करण्यात आल्याचे यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा हा प्रकल्प असणार असल्याचे म्हणत त्यांनी या प्रकल्पाचे कौतुक केले.

पहिल्यांदा सागरी सेतूवरून वाहने धावली!

प्रकल्पातील संपूर्ण सागरी पुलाचे काम पूर्ण झाले असल्याने आता सागरी सेतूवरून वाहने नेता येऊ लागली आहेत. त्यानुसार बुधवारी पहिल्यांदा मोठ्या संख्येने या सागरी सेतूवरून वाहने धावली. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनीही सागरी सेतूवरून प्रवासाचा आंनद घेतला. दरम्यान, सागरी सेतूवरून वाहने धावू शकणार असल्याने एमएमआरडीएलाही मोठा दिलासा मिळणार आहे. कारण आता बांधकाम साहित्य नेणे सोपे होणार आहे. त्यामुळे जी उर्वरित कामे बाकी आहेत ती आता वेगाने पुढे जातील, असा विश्वास एमएमआरडीएने व्यक्त केला आहे.

चरस विकणाऱ्या महिलेला अटक

कल्याण : आंबिवलीजवळील इराणी वस्तीमधून खडकपाडा पोलिसांनी एम. डी. चरस विकणाऱ्या एका महिलेला अटक केली. सबा सय्यद असे या महिलेचे नाव आहे. इराणी वस्तीमधील एक महिला आंबिवली, मोहने परिसरात एम. डी. चरस विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या महिलेवर पाळत ठेऊन तिला इराणी वस्तीमधून मंगळवारी अटक केली. तिच्याकडे एम. डी. चरसचा साठा आढळून आला. ती चरस कोठून आणत होती. ती कोणाला विकत होती याचा तपास पोलीस करत आहेत.

पोलीस कोठडीतून आरोपी पळाला

कल्याण : महात्मा फुले पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीतून बुधवारी पहाटेच्या सुमारास शहापूरजवळील वांद्रे-पिवळी गावातील एक आरोपी कोठडीचे गज वाकवून पळून गेला. गस्तीवरील पोलिसांनी त्याचा पाठलाग केला, परंतु अंधाराचा फायदा घेऊन तो पळाला. राम सखाराम काकड (१९) असे आरोपीचे नाव आहे.

'एसी' लोकलमध्ये १९ ते ३१ मेपर्यंत तिकीट तपासनीस पथक

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मध्य रेल्वेवरील वातानुकूलित लोकलमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आधी या लोकलचे तिकीट किंवा मासिक पास काढूनच प्रवास करावा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे. मध्य रेल्वेने १९ ते ३१ मे या कालावधीत वातानुकूलित लोकलमधील विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. तिकीटधारक प्रवाशांकडून वारंवार येणाऱ्या तक्रारींमुळे आणि तिकीटधारक प्रवाशांना चांगल्या सुविधा पुरवण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

मध्य रेल्वेवरील सामान्य लोकलप्रमाणे वातानुकूलित लोकलमध्ये गर्दी होऊ लागली आहे. या लोकलमध्ये विनातिकीट प्रवासी बसतात त्यामुळे तिकीटधारक प्रवाशांना उभ्याने प्रवास करावा लागतो, अशा तक्रारी मध्य रेल्वे प्रशासनाला प्राप्त झाल्या. त्याची दखल घेत मध्य रेल्वेने १९ मेपासून विशेष तिकीट तपासणी मोहीम सुरू केली आहे. दररोज सकाळी ७.४३ ते रात्री ११.२८ पर्यंतच्या एकूण ४५ वातानुकूलित लोकल फेऱ्यांमधील प्रत्येक प्रवाशावर तिकीट तपासनीसाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. रेल्वे सुरक्षा बल, वाणिज्य विभाग या दोन विभागाद्वारे प्रत्येक वातानुकूलित लोकलमध्ये जाऊन विनातिकीट प्रवाशांना पकडण्यात येत आहे. या पथकात एकूण १६ कर्मचारी तैनात केले आहेत, अशी माहिती मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

मध्य रेल्वेवरून दररोज ५६ वातानुकूलित लोकल फेऱ्या धावतात. यामधून सुमारे ५० हजार प्रवासी प्रवास करतात, मात्र विनातिकीट प्रवाशांची संख्या वातानुकूलित लोकलमध्ये वाढल्याने या लोकलमध्ये गर्दीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. १९ मे रोजीपासून सुरू झालेल्या मोहिमेत दररोज २५० ते ३०० विनातिकीट प्रवाशांवर कारवाई केली जात आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'वन स्टॉप सेंटर'ची संख्या वाढविणार

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : संकटग्रस्त महिलांना खासगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही ठिकाणी एकाच छताखाली मदत उपलब्ध करणे, वैद्यकीय, कायदेशीर सुविधा देण्याच्या उद्देशाने राज्यात जिल्हानिहाय 'वन स्टॉप सेंटर' ही योजना सुरू करण्यात आली. मात्र वाढती लोकसंख्या आणि महिलांकडून मिळणार प्रतिसाद लक्षात घेऊन या केंद्रांचा विस्तार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार आता मुंबई उपनगर, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व ठाणे या शहरांसाठी प्रत्येकी एक अशी पाच अतिरिक्त 'वन स्टॉप सेंटर्स' सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे या केंद्रांची संख्या ३७ वरून ४२ इतकी होणार आहे.

केंद्र सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाने डिसेंबर २०१७ रोजी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक, तर पुणे जिल्ह्यासाठी दोन अशी ३७ 'वन स्टॉप सेंटर्स' सुरू करण्यात आली आहेत. मात्र शहरी भागामधील वाढती लोकसंख्या, त्याचबरोबर महिलांवर होणारे वाढणारे अत्याचार, हिंसा या बाबी लक्षात घेऊन राज्यातील मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असलेल्या मुंबई उपनगर, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व ठाणे या शहरांसाठी प्रत्येकी एक अशी पाच अतिरिक्त 'वन स्टॉप सेंटर्स' सुरू करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. मानसिक छळ किंवा व कोणत्याही संकटग्रस्त महिलांना मदत करण्यासाठी संस्थात्मक, मनोसामाजिक, कायदेशीर समुपदेशकांमार्फत साहाय्य करता यावे म्हणून ही संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

लाभ कोणाला?

- आपत्कालीन आणि गैर-आपत्कालीन परिस्थितीत राज्यातील अत्याचारग्रस्त, तसेच संकटग्रस्त महिलांना लाभ मिळणार आहे.
- संकटग्रस्त महिला आणि त्यांच्या सर्व वयोगटातील मुली आणि १२ वर्षे वयापर्यंतची मुले यांना कमाल पाच दिवसांकरिता 'वन स्टॉप सेंटर'मध्ये तात्पुरता आश्रय घेता येईल.
- तात्पुरत्या निवाऱ्यासाठी महिलेची प्रवेश योग्यता नियमानुसार ठरविण्यात येईल. दीर्घकालीन निवाऱ्याची आवश्यकता असल्यास 'शक्ती सदन'च्या सहयोगाने व्यवस्था केली जाईल.
- १८ वर्षांखालील मुली सदर केंद्राच्या संपर्कात आल्यास त्यांनाही संस्थांशी समन्वय साधून सेवा पुरवल्या जातील.